मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » गुरुवार, दि. 24 ऑक्टोबर 2024 | पान- 1

# चिंचवड विधानसभेसाठी काटे-कलाटे-भोंडवेमध्ये उमेदवारीसाठी रस्सीखेच...

## चिंचवड विधानसभेत महाविकास आघाडीच्या उमेदवाराची प्रतिक्षा... : महायुतीचा उमेदवार घोषित झाला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात महायुतीचा उमेदवार घोषित झाला आहे. आता सर्वांना प्रतिक्षा आहे, महाविकास आघाडीच्या उमेदवाराची, मात्र जागावाटपाचा तिढा वाढत चालला आहे. या जागेवर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने तयारी चालवली असतानाच आता शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाने घटक पक्षांवर कुरघोडी करणे सुरु केले आहे. शरद पवार गटाने उमेदवार आयात करण्याची चाल आखली आहे, तर उद्धवसेनेने माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे यांना पक्षप्रवेश देत काटशह दिला आहे. त्यामुळे चिंचवडच्या तिकिटाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. काटे-कलाटे-भोंडवे यांची उमेदवारी मिळवण्यासाठी रस्सीखेच सुरु असल्याचे चित्र चिंचवड विधानसभेत पहायला मिळत आहे.



लोकसभेच्या निवडणुकीनंतर बदलाच्या वाऱ्याचा अंदाज घेत महाविकास आघाडीतील शरद पवार गट आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटात जोरदार 'इनकमिंग" सुरू आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघ 'मविआ'तील कोणत्या पक्षाला सुटणार, याबाबत तर्कवितर्क केले जात आहेत. राष्ट्रवादीतील अजित पवार गटाचे नेते नाना काटे आणि अजित पवार गटासह शिंदेसेनेशीही जवळीक असलेले राहुल कलाटे यांनी शरद पवार गटाशी घरोबा करण्याचे ठरवले आहे. महायुतीत अजित पवार गटाला ही जागा मिळणार नसल्याने आणि 'मविआ'तील शरद पवार गटाचा दावा प्रबळ असल्यानेच दोघांनी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे. या दोघांची रस्सीखेच सुरू असून, आणखी काही माजी नगरसेवकांनीही 'तुतारी तील इच्छुकांच्या रांगेत थांबणे पसंत केले आहे. 'तुतारी'कडे तगड़ा उमेदवार नसल्याने आयातीवर भिस्त ठेवावी लागणार आहे. त्यामुळे काटे-कलाटे यांची नावे दावेदार म्हणून पुढे आली.

या दरम्यान उद्धवसेनेनेही तयारी सुरू केली होती. अजित पवार गटाच्या काही माजी नगरसेवकांनी शरद पवारांची भेट घेतली होती, त्यात मोरेश्वर भोंडवे हेही होते. त्याच भोंडवे यांनी शुक्रवारी उद्धवसेनेत प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशामुळे चिंचवडची जागा उद्धवसेनेला सुटणार, की शरद पवार गटाला जाणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. भोंडवे यांनी २०१४ ला अपक्ष म्हणून निवडणूक लढवत दहा हजार मते खाल्ली होती.

चिंचवडच्या २०२३ मधील पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राहुल कलाटेंसाठी अतोनात प्रयत्न केले होते. मात्र, कलाटेंना राष्ट्रवादीचे तिकीट मिळाले नाही. ते अपक्ष म्हणून थांबले. तेव्हा राष्ट्रवादीचे उमेदवार असलेल्या नाना काटेंच्या प्रचारासाठी डॉ. कोल्हे फिरकलेही नाहीत. उलट त्यांनी कलाटेंचे चिन्ह असलेल्या शिटी'चा छुपा प्रचार केल्याची उघड चर्चा होती. आताही डॉ. कोल्हे यांनी शरद पवार गटात कलाटेंचा प्रवेश व्हावा आणि त्यांनाच तिकीट द्यावे यासाठी 'फिल्डिंग लावल्याचे दिसले.

चिंचवडच्या पोटनिवडणुकीत जगताप-कलाटे- काटे अशी तिरंगी लढत झाली होती. कलाटे यांचे मतविभाजन झाल्याने जगतापांचा विजय सुकर झाला होता. कलाटे यांच्यामुळेच आपण पडलो, अशी सल काटे खासगीत बोलून दाखवतात, तर माझ्या वाटेत काटेंनी काटे पसरले नसते, तर मी जगतापांचा पराभव करू शकलो असतो, असे कलाटे सांगतात. आताही ते दोघे एकमेकांच्या मार्गातील अडसर बनले आहेत

नाना काटे यांची राजकीय वाटचाल अजित पवारांचे बोट धरून झाली आहे. त्यामुळे त्यांनी सोबत सोडलेली नाही. दहा वर्षात दोनदा झगडूनही काटेंना विधानसभेत प्रवेश करता आलेला नाही. यादरम्यान पिंपरी-चिंचवड महापालिकेत नगरसेवकही नसलेल्या अमित गोरखे यांना भाजपने विधान परिषदेवर पाठवले. मात्र, महापालिकेत अजित पवार गटाचा किल्ला सांभाळूनही आणि दोनदा विधानसभा लढवूनही अजित पवारांनी विधान परिषदेवर संधी न दिल्याने काटे दुखावले आहेत. त्यातच भाजपसोबत जावे लागत असल्याने महायुतीच्या तिकिटाची संधी हुकली आहे. आता भाजपच्या कमळाचा प्रचार केल्यानंतर पुढे महापालिकेवेळी राष्ट्रवादीच्या घड्याळाचा प्रचार कसा करायचा, असाही पेच त्यांच्यापुढे आहे. या दुखण्यामुळेच ते 'तुतारी' हाती घेण्याच्या तयारीत आहेत. मात्र, जागावाटपाचा संभ्रम वाढल्याने त्यांचे दुखणे बळावले आहे.

# मतदान वाढवण्यासाठी सर्वसमावेशक आराखडा अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांची माहिती

## मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यात आला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यात आला आहे. शहरी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रभावीपणे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्यावतीने मतदान जनजागृती करण्यासाठी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी माहिती दिली. यावेळी उपायुक्त अण्णा बोदडे, सहायक आयुक्त अविनाश शिंदे, तानाजी नरळे आदींसह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



पुणे जिल्ह्यातील सरासरी मतदानाचे प्रमाण हे राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील सरासरी मतदानाच्या प्रमाणापेक्षा कमी असून, याबाबत भारत निवडणूक आयोगाने चिंता व्यक्त केली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात येणाऱ्या पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदार संघात सरासरी मतदानाचे प्रमाण कमी असल्याचे गत सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत आढळले. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निवडणूक शाखेमार्फत पिंपरी चिंचवड महापालिकेला मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी कार्यक्रम घेण्याबाबत कळवले आहे. त्याअनुषंगाने महापालिकेच्यावतीने अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी त्याचा आढावा घेतला.

खोराटे म्हणाले की, शहरातील महत्त्वाचे चौक, उद्याने, क्रीडांगणे, महाविद्यालये आदीसह गर्दीच्या ठिकठिकाणी स्वीप कक्षाच्यावतीने मतदार जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच मतदारांना त्यांच्या मतदान केंद्राची माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये 'नो युवर वोटिंग सेंटर' हेल्पलाईनदेखील सुरू करण्यात येणार आहे.

दिवाळी पहाट कार्यक्रमांच्या माध्यमातून सर्व मतदारांना मताचा हक्क बजावण्याचे आवाहन केले जाणार आहे. शहरातील वर्दळीच्या ठिकाणी पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. महापालिकेची अधिकृत समाजमाध्यमे, रेडिओ, रिक्षा, होर्डिंग्ज, महापालिकेचे व्हीएमडी अशा विविध माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त अण्णा बोदडे यांनी दिली.

# मावळ विधानसभेसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून आमदार सुनील शेळके यांना उमेदवारी जाहीर

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ विधानसभेचे विद्यमान आमदार सुनील शेळके यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाकडून अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर करण्यात आली. यामध्ये मावळ विधानसभेसाठी आमदार सुनील शेळके यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून मावळ मतदार संघ भाजपला सुटणार का अथवा येथील उमेदवार बदलला जाणार का या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.



२०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांचा ९४ हजार मतांच्या फरकांनी पराभव करत आमदार सुनील शेळके यांनी मावळच्या जागेवर राष्ट्रवादीच्या घड्याळाची टिकटिक केली होती. मागील पाच वर्षाच्या कालखंडामध्ये तब्बल पाच हजार कोटीहून अधिक रुपयांचा निधी मावळ तालुक्यात आणत त्यांनी मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत. मावळ तालुका हा पर्यटनाच्या दृष्टीने स्वयंपूर्ण होत येथील प्रत्येक नागरिकाच्या हाताला स्वतःचा रोजगार व व्यवसाय मिळावा यासाठी त्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. महिला भगिनींच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा उतरावा यासाठी त्यांनी जलजीवन मिशन अंतर्गत मोठ्या प्रमाणात गावोगावी पाणीपुरवठा योजना राबवले आहेत. शिवण क्लासच्या माध्यमातून महिला भगिनींना स्वयंपूर्ण केले आहे. विविध भागातील पूल, रस्ते ही कामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत.

( उर्वरित पान 2 वर )

# 'ससून'वरील ताण कमी होणार!

**ससून रुग्णालयातील रुग्णसंख्या क्षमतेपेक्षा जास्त आहे, त्यातच न्यायवैद्यक प्रकरणांचा भारही ससूनवर आहे.,तो कमी करण्यासाठी आता पावले उचलली जात आहेत.**

**पुणे | प्रतिनिधी**

ससून सर्वोपचार रुग्णालयावरील ताण दिवसेंदिवस वाढत आहे. रुग्णालयात रुग्णांची संख्या जास्त असतानाच न्यायवैद्यक प्रकरणांचा भारही ससूनवर वाढला आहे. हा भार कमी करण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत. हडपसर आणि वानवडी पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील न्यायवैद्यक प्रकरणे आता सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयात (एएफएमसी) पाठविण्यात येणार आहेत.

पुणे शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील न्यायवैद्यक प्रकरणे ससून रुग्णालयात पाठविली जातात. ससूनवर आधीच जास्त रुग्णसंख्येचा ताण असताना हा भारही दिवसेंदिवस वाढत होता. यामुळे औंधमधील जिल्हा रुग्णालय, पिंपरी-चिंचवडमधील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) आणि वानवडीतील एएफएमसी रुग्णालयात न्यायवैद्यक प्रकरणे पाठविण्यात यावीत, अशी मागणी ससून रुग्णालयाकडून करण्यात येत होती. ससून रुग्णालयावरील न्यायवैद्यक प्रकरणांचा ताण वाढल्याने त्यांचे अहवाल मिळण्यासही विलंब होत होता. पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी काही दिवसांपूर्वी या प्रकरणी बैठक घेतली. त्यावेळी इतर रुग्णालयांत न्यायवैद्यक प्रकरणे पाठविण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांनी याबाबत नुकतीच बैठक घेतली. या बैठकीत वानवडी आणि हडपसर पोलीस ठाण्यातील न्यायवैद्यक प्रकरणे एएफएमसीमध्ये पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. अतिरिक्त आयुक्तांनी याबाबतचे पत्र हडपसर, वानवडी पोलीस ठाण्यांसोबत एएफएमसी आणि ससूनला पाठविले आहे. ससून रुग्णालयातील रुग्णसंख्या क्षमतेपेक्षा जास्त आहे. त्यातच न्यायवैद्यक प्रकरणांचा भारही ससूनवर आहे.तो कमी करण्यासाठी आता पावले उचलली जात आहेत. ससून रुग्णालयावरील न्यायवैद्यक प्रकरणांचा ताण वाढल्याने त्यांचे अहवाल मिळण्यासही विलंब होत होता. न्यायवैद्यकीय शवविच्छेदन, वयनिश्चिती, जखमांचे अहवाल, सक्षमता तपासणी आदी प्रक्रियांचा समावेश आहे. राज्य सरकारच्या गृह विभागाने याबाबतचा शासन निर्णयही घेतला होता. या पत्रानुसार दोन्ही पोलीस ठाण्यांनी कार्यवाही करावी.




### पत्रात नेमके काय...

» अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे यांनी पत्रात म्हटले आहे की, वानवडी व हडपसर पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील सर्व न्यायवैद्यक प्रकरणे हाताळण्यासाठी एएफएमसीला प्राधिकृत करण्यात आले आहे. यात न्यायवैद्यकीय शवविच्छेदन, वयनिश्चिती, जखमांचे अहवाल, सक्षमता तपासणी आदी प्रक्रियांचा समावेश आहे. राज्य सरकारच्या गृह विभागाने याबाबतचा शासन निर्णयही घेतला होता. या पत्रानुसार दोन्ही पोलीस ठाण्यांनी कार्यवाही करावी.

### न्यायवैद्यक तपासण्या

- न्यायवैद्यकीय शवविच्छेदन
- वयनिश्चिती
- जखमांचे अहवाल
- सक्षमता तपासणी


> ससून रुग्णालयातील रुग्णसंख्या क्षमतेपेक्षा जास्त आहे. त्यातच न्यायवैद्यक प्रकरणांचा भारही ससूनवर आहे. तो कमी करण्यासाठी आता पावले उचलली जात आहेत. पुढील काळात इतर रुग्णालयांवर न्यायवैद्यक प्रकरणांची जबाबदारी सोपविण्यासाठी पत्रव्यवहार केला जाणार आहे.
> - डॉ. एकनाथ पवार, अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय.

# 'रिंगरोड' लगतच्या 117 गावांचा करणार विकास

**राज्य रस्ते विकास महामंडळा'ला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता देण्यात आली आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यामधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तसेच, विशेषत: महामार्गावरील वाहतूक समस्येवर मार्ग काढण्यासाठी वर्तुळाकार मार्ग प्रकल्प (रिंग रोड) तयार केला जात आहे. या रिंगरोड लगत असलेल्या ११७ गावांचा विकास करण्यासाठी 'राज्य रस्ते विकास महामंडळा'ला (एमएसआरडीसी) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता देण्यात आली आहे.



पुण्यामधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तसेच, विशेषत: महामार्गावरील वाहतूक समस्येवर मार्ग काढण्यासाठी वर्तुळाकार मार्ग प्रकल्प (रिंग रोड) तयार केला जात आहे. या रिंगरोड लगत असलेल्या ११७ गावांचा विकास करण्यासाठी 'राज्य रस्ते विकास महामंडळा'ला (एमएसआरडीसी) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मान्यता देण्यात आली आहे. या गावांचे एकूण क्षेत्र ६६८ चौरस किलोमीटर आहे. या संपूर्ण क्षेत्राचा विकास 'एमएसआरडीसी'च्या माध्यमातून केला जाणार आहे. याबाबतची अधिसूचना १० ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. 'रिंगरोड'च्या अंमलबजावणीसाठी 'एमएसआरडीसी पुणे रिंग रोड लिमिटेड' (एमपीआरआरएल) या नावाने एका कंपनीची स्थापना करण्यात आली आहे.

'एमएसआरडीसी'च्या माध्यमातून १७२ किलोमीटर लांबीचा आणि ११२ मीटर रुंदीचा 'रिंग रोड' तयार केला जाणार आहे. या प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. या प्रकल्पालगतच्या ११७ गावांच्या विकासाबाबत नियोजनबद्ध काम करण्यासाठी एमएसआरडीसीची नियुक्ती करण्यात आली आहे. या 'रिंगरोड' लगतच्या गावांमध्ये दोन आर्थिक विकास केंद्र उभारण्यात येणार आहेत. तसा प्रस्ताव 'एमएसआरडीसी'कडून नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आला होता. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अखत्यारीतील ६६८ चौरस किलोमीटर क्षेत्रफळावरील हवेली भोर, पुरंदर तालुक्यांतील ६२ गावांमध्ये एक आणि हवेली, मुळशी, वेल्हे तालुक्यांतील ५५ गावांमध्ये एक अशी दोन आर्थिक विकास केंद्र विकसित केली जाणार असल्याचे सांगितले.

# मावळ विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून आमदार सुनील शेळके यांना उमेदवारी जाहीर

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

पर्यटनाच्या दृष्टिकोनातून ग्लास स्काय वॉक सारखा जागतिक प्रकल्प लोणावळ्यात आला आहे. मावळ तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून कान्हे फाटा व लोणावळा या ठिकाणी दोन उपजिल्हा रुग्णालय मंजूर करत त्यांची कामे अंतिम टप्प्यात आणली आहेत. कोरोना काळात त्यांनी तालुक्यातील जनतेला कुटुंबा प्रमाणे सांभाळले. विविध शासकीय कार्यालयांनी कामे सुरू आहेत. अशा विविध प्रकारे विकास कामे करत त्यांनी मावळातील नागरिकांना न्याय देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला आहे. त्यांच्या याच कामाची दखल घेत आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा यांनी आमदार सुनील शेळके यांना पुन्हा दुसऱ्यांदा मावळ विधानसभेसाठी संधी दिली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या ३८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीमध्ये आमदार सुनील शेळके यांचे नाव समाविष्ट आहे.

वास्तविक पाहता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष व संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष, ज्येष्ठ नेते बापूसाहेब भेगडे हे देखील यावेळी मावळ विधानसभेसाठी प्रमुख दावेदार मानले जात होते. मात्र आमदार सुनील शेळके यांनी केलेली विकास कामे व जनतेचा त्यांना असलेला पाठिंबा पाहूनच ही उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. बापूसाहेब भेगडे यांना देखील पक्षाकडून महामंडळ देण्यात आले होते. मात्र मला महामंडळ नको, मावळची उमेदवारी द्या अशी मागणी बापूसाहेब भेगडे यांनी पक्षाकडे केली होती. त्यांच्या मागे देखील कार्यकर्त्यांचा मोठा समूह आहे. महायुती मधील घटक पक्ष असलेल्या भाजपने देखील ही जागा भारतीय जनता पार्टीला सुटावी याकरता जोरदार प्रयत्न केले होते. रवींद्र भेगडे हे याकरिता इच्छुक होते. मात्र ज्या पक्षाचा आमदार त्या पक्षाला जागा या न्याय तत्त्वानुसार महायुतीतील जागा वाटपामध्ये सदरची जागा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या वाट्याला आली असून पक्षाकडून सुनील शेळके यांच्या अधिकृत उमेदवारीची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे पक्षातील दुसरे प्रमुख दावेदार असलेले बापूसाहेब भेगडे हे काय भूमिका घेणार याकडे आता सर्व मावळ तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान गुरुवारी २४ ऑक्टोबर रोजी आमदार सुनील शेळके आपल्या शेकडो कार्यकर्त्यांच्या सह वडगाव मावळ येथे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. ज्या पोटोबा महाराजांच्या मंदिरात शपथ घेऊन मागील वर्षी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला होता, त्याच पोटोबा महाराजांच्या दर्शनाने या वर्षी देखील जाहीर झालेल्या उमेदवारीचे स्वागत केले जाणार असल्याचे आमदार सुनील शेळके युवा मंचच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# महापालिकेत इलेक्शन फिव्हर, कामकाज ठप्प

## अत्यावश्यक विभागातील कर्मचाऱ्यांनाही इलेक्शन ड्युटी : सवलतीसाठी आयुक्तांचे आयोगाला पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या अत्यावश्यक विभागासह सर्वच विभागांची अधिकारी व कर्मचाऱ्यांना पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभेच्या निवडणूक कामकाजासाठी नेमण्यात आले आहे. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नसल्याने महापालिकेच्या दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम झाला आहे. महापालिकेच्या अत्यावश्यक विभागातील कर्मचाऱ्यांना तरी निवडणूक कामकाजातून वगळावे, असे विनंतीवजा पत्र महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता मंगळवार (दि.१५) पासून लागू झाली आहे. शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी हे तीन विधानसभा क्षेत्र आहेत. त्या मतदारसंघाच्या निवडणूक कामकाजासाठी महापालिकेच्या बहुतांश विभागांच्या अधिकारी कर्मचारी तसेच, शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यातून अत्यावश्यक सेवेतील पाणीपुरवठा, अग्निशमन, ड्रेनेज, आरोग्य, विद्युत या विभागांतील अधिकारी व कर्मचारीही सुटलेले नाहीत. नेमलेल्या मतदार संघाच्या कामासाठी हजर न झाल्यास कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.



### महापालिकेची वाहनेही काढून घेतली

**»विधानसभानिहाय निवडणूक कामकाजासाठी विविध पथकांची स्थापना करण्यात आली आहे. त्या पथकांना वाहने दिले जाते. त्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेची वाहने निवडणूक विभागाकडून ताब्यात घेण्यात येत आहेत. मुदतीमध्ये संबंधित वाहने महापालिकेने निवडणूक विभागाकडे जमा न केल्यास कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.**

सर्वच अधिकारी व कर्मचारी इलेक्शन ड्युटीत व्यस्त असल्याने महापालिका व क्षेत्रीय कार्यालये ओस पडली आहेत. त्यामुळे महापालिकेचे दैनंदिन कामकाज जवळजवळ ठप्प झाले आहे. आचारसंहिता संपेपर्यंत म्हणजे २३ नोव्हेंबरपर्यंत अशीच स्थिती राहणार असल्याने सर्वच कामे जवळजवळ दीड महिना खोळंबून राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इलेक्शन ड्युटीतून पाणीपुरवठा, आरोग्य, अग्निशमन, ड्रेनेज, कर संकलन या अत्यावश्यक विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना वगळावे, अशी विनंतीवजा पत्र आयुक्त सिंह यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठवले आहेत. आयुक्तांच्या पत्राला निवडणूक विभाग कितपत प्रतिसाद देतो, हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

# 'स्पेस ऑन व्हिल्स' शहरात होणार दाखल

## विज्ञान भारती व पिंपरी-चिंचवड सायन्स पार्कच्या वतीने ही माहिती देण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

संपूर्ण देशाचा स्वाभिमान असलेली भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या भेटीला येणार आहे. पश्चिम महाराष्ट्रातील तसेच प्रामुख्याने पिंपरी-चिंचवड शहरातील विद्यार्थी आणि विज्ञानप्रेमी नागरिकांना 'स्पेस ऑन व्हिल्स' या उपक्रमांतर्गत इस्रोच्या आजवरच्या पराक्रमांची रोमांचकारी सफर अनुभवता येणार आहे. १९ ते २० या दोन दिवशी ते उपलब्ध असणार आहे. विज्ञान भारती व पिंपरी-चिंचवड सायन्स पार्कच्या वतीने ही माहिती देण्यात आली.

विज्ञान भारती आणि इस्रो यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्पेस ऑन व्हील्स' हा विशेष विज्ञान प्रचार उपक्रमाची १७ ऑक्टोबर २०२४ रोजी पुण्यात उत्साहात सुरुवात झाली आहे. १९ व २० ऑक्टोबर शनिवार व रविवारी रोजी 'स्पेस ऑन व्हिल्स' पिंपरी चिंचवड सायन्स पार्क व तारांगण येथे विज्ञानप्रेमींसाठी सकाळी १० ते सायं. ०६ या वेळेत उपलब्ध असणार आहे. यानंतर 'स्पेस ऑन व्हिल्स' रहाटणी येथील एसएनबीपी विद्यालय येथे २१ व २२ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून अंतराळ विज्ञानाचा प्रचार आणि विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश आहे.

विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या समन्वयाने हा उपक्रम राबवला जात आहे. पहिल्या टप्प्यात पुणे, पिंपरी चिंचवड शहरांत 'स्पेस ऑन व्हिल्स' हा उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार आहे. भारताच्या विकासामध्ये अवकाश विज्ञानाच्या प्रगतीचा मोठे योगदान आहे. आधुनिक भारताच्या जडण-घडणीत भारतीय अवकाश संशोधन संस्थेने गेल्या सहा दशकांत अनेक अडचणीचे टप्पे पार करून अंतरिक्ष युगात जी झेप घेतली आहे त्यामुळे संपूर्ण मानवजातीला त्यांचे विविध क्षेत्रांत लाभ मिळत आहेत व अशा प्रगतीची झलक इस्रोच्या या प्रदर्शनातून दाखविली जाणार आहे तरी, जास्तीत जास्त विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




**ही आहेत 'स्पेस ऑन व्हिल्स'ची वैशिष्ट्ये :**

अंतराळ संशोधनाची ओळख: इस्रोच्या यशस्वी मोहिमांचे प्रतिकृती मॉडेल्स आणि संबंधित माहिती.

शैक्षणिक उपक्रम: विद्यार्थ्यांना व्यावहारिक अनुभव देणारे क्रियाकलाप आणि स्पर्धा.

### उपक्रमात नक्की काय?

**» 'स्पेस ऑन व्हील्स' कार्यक्रमासोबतच, विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय, विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची आणि कल्पकतेची परीक्षा घेण्यासाठी प्रश्नमंजूषा आयोजित केल्या जातील. ह्याचे आयोजन संबंधित संस्थेच्या सहकार्याने होईल.**

# सीसीटीव्हीसाठी पालिकेचा आखडता हात

## पुणे महापालिकेकडून बसविण्यात आलेले सीसीटीव्ही देखभाल दुरुस्ती अभावी रखडली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेकडून बसविण्यात आलेले सीसीटीव्ही देखभाल दुरुस्ती अभावी रखडली आहे. या माहितीमुळे महानगरपालीकेचा उदासिन कारभार समोर आला आहे. गणेशोत्सवात सर्व सीसीटीव्ही दुरुस्त होतील असे आश्वासन देऊनही अद्यापही ७२५ सीसीटीव्हींची दुरुस्ती आवश्यक आहे.

गणेशोत्सवात सीसीटीव्हींची दुरुस्ती केली जाईल, असे महापालिका आयुक्तांना जाहिर केले होते. परंतु अद्याप अनेक सीसीटीव्ही बंद आहेत. महापालिकेच्या या उदासीन कारभारामुळेच सीसीटीव्हींची देखभाल दुरुस्ती रखडली आहे. तर पुणे शहरात गुन्हेगारी वाढत असताना प्रशासनाकडून कायदासुव्यवस्थेच्या सुरक्षिततेसाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसते.



या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून शहरातील वाहतूक कोंडी सुरळीत करता, येईल असा हेतू ठेवून महापालिकेतील नगरसेवकांनी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. शहरातील सुमारे एकोणतीशे सीसीटीव्ही कॅमेरे पैकी एक हजार ५४ सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची माहिती समोर आली होती.

हे कॅमेरे दुरुस्त करण्यावरुन पुणे पोलीस आणि महापालिका प्रशासनाचे वाद सुरु होता.रस्त्यावर बसविलेल्या या कॅमेऱ्यांची दुरुस्ती महापालिका कशी काय करणार असाही प्रश्न आता पालिका प्रशासनाला पडला होता. तसेच याची दुरुस्ती महापालिकेने करावी की पोलिसांनी करावी असाही मोठा प्रश्न पडला होता.

सीसीटीव्हींच्या दुरुस्तीसाठी महापालिकेकडे बजेट नव्हते.त्यामुळे विद्युत विभागाने हात वर केले होते. त्यावर महापालिका आयुक्तांनी पुढे येत शहराची जबाबदारी असून महापालिकाच सीसीटीव्ही दुरुस्त करेल असे जाहिर केले होते. विद्युत विभागाच्या मागणीनुसार कॅमेऱ्यांच्या दुरूस्तीसाठी ५० लाख रूपये वर्गीकरणाने निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यानंतर तात्काळ शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या दुरूस्तीचे काम सुरू करण्यात आले होते.

शहरात भरदिवसा कोयता गँग हातात कोयते घेवून दहशत पसरविली जात आहे. बोपदेव घाटात एका महिलांवरील अत्याचाराची गंभीर घटना घडली होती. रस्त्यांवरील अपघात, वाहनचोरी, जबरी चोरी, दरोडा, वर्दळीच्या ठिकाणी खून, खुनाचा प्रयत्न अशा या घटना सातत्याने शहरात घडत आहेत. तसेच प्रभात रस्ता परिसरात चंदनचोरी व दहशत पसरविण्याच्या घटनांसह महिलांवरील अत्याचार, जीवघेणे अपघात, जबरी चोरी, दरोडा यासारख्या गंभीर घटना शहरात घडत आहेत. महत्त्वाच्या ठिकाणी बसवलेले महापालिकेचे सीसीटीव्ही बंद असल्याने पुढील कारवाईला अडचणी येत आहेत. असे असतानाही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखभाल दुरुस्तीबाबत महापालिका प्रशासन गंभीर नसल्याचे दिसून येत आहे. शहराला मोठ्या प्रमाणात सीसीटीव्हींची आवश्यकता असतानाच दुसरीकडे उपलब्ध असलेल्या सीसीटीव्हींची देखभाल दुरुस्ती करण्याकडे दुर्लक्ष होत आहे.

> “ महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार सीसीटीव्हींची देखभाल दुरुस्ती केली जात आहे. काही कॅमेऱ्यांना विद्युत पुरवठा करण्यासा तांत्रिक अडचण येत आहे. तातडीने सीसीटीव्ही दुरुस्तीची कामे केली जातील.
> **- मनीषा शेकटकर, प्रमुख, विद्युत विभाग, महापालिका.**

# आता उन्हाळयाच्या सुट्ट्या होणार कमी?

## सर्व शाळा 1 एप्रिलला सुरु : वार्षिक वेळापत्रक सीबीएसईपॅटर्न प्रमाणे

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचा शालेय आणि कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाची दिशा ठरवणारा राज्य अभ्यासक्रम आराखडा जाहीर झाला आहे. ज्यामध्ये शाळांचे वार्षिक वेळापत्रक 'सीबीएसई'प्रमाणे आखण्याची शिफारस केली आहे. ही शिफारस मान्य झाली, तर लवकरच राज्यातील सर्व शाळांमधील शैक्षणिक वर्ष एक एप्रिलपासून सुरू होईल.

सीबीएसईच्या धर्तीवर लागू होणारा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शाळांमध्ये दर दिवशी अध्यापनाचे पाच ते साडेसहा तास होणे आवश्यक आहेत. सध्या पूर्ण वेळ किंवा दोन सत्रांमध्ये भरणाऱ्या शाळांमध्ये हे प्रमाण चार ते साडेचार तास आहे. त्यामुळे शाळांना शिकवण्यासाठी कमी वेळ मिळत आहे. यामुळेच सुट्ट्या कमी करून हे तास भरून काढण्याचे नियोजन आहे.



राज्यातील सर्व शासकीय, खासगी अनुदानित, विनाअनुदानित शाळांमध्ये लवकरच सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रम राबवला जाईल, असे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी जाहीर केले होते. त्या अनुषंगाने शाळांचे वार्षिक वेळापत्रकही सीबीएसई शाळांप्रमाणेच आखण्याची शिफारस नव्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात करण्यात आली आहे. या शिफारशीबाबत राज्य शिक्षक, मुख्याध्यापक संघटना हरकत नोंदवण्याची शक्यता आहे.

**या आहेत शिफारशी...**

नवीन शैक्षणिक वर्ष १ एप्रिलला सुरू होणार, ३१ मार्च रोजी वार्षिक परीक्षेच्या निकालाने शैक्षणिक वर्षाची समाप्ती केले जाईल. मे हा एक महिना उन्हाळी सुट्टी असणार आहे. त्यानंतर एक जूनपासून पुन्हा शाळा सुरू राहणार आहे. खूप दीर्घकालीन सुट्ट्या न देता शाळेतच अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुरू ठेवण्याचे नियोजन आहे.

### सुट्ट्या कमी का करणार?

**» सीबीएसईच्या धर्तीवर लागू होणारा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शाळांमध्ये दर दिवशी अध्यापनाचे पाच ते साडेसहा तास होणे आवश्यक आहेत. सध्या पूर्ण वेळ किंवा दोन सत्रांमध्ये भरणाऱ्या शाळांमध्ये हे प्रमाण चार ते साडेचार तास आहे. त्यामुळे शाळांना शिकवण्यासाठी कमी वेळ मिळत आहे. यामुळेच सुट्ट्या कमी करून हे तास भरून काढण्याचे नियोजन आहे.**

> “ आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम प्रचंड वाढला आहे. आता राज्यातील बोर्डाच्या मुलांना सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या मुलांसोबत स्पर्धा करावी लागते. हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आणि आपल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर सक्षम करण्यासाठी वार्षिक वेळापत्रकात हे बदल करण्यात येणार आहेत.
> **- राहुल रेखावार, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद.**